



# ज्योतिर्मय

Online Journal of Literature.... साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २२० वा ❑ बुधवार दि.२२ ऑक्टोबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## आत्मनिर्भर भारताच्या ध्येयाकडे एक मजबूत पाऊल...

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

आत्मनिर्भर भारत संकल्पनेला बळ देणारी ऐतिहासिक घटना नाशिक सह संपूर्ण देशवाशीयांनी अनुभवली.

सरकारी मालकीच्या एरोस्पेस कंपनी हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड () द्वारे निर्मित स्वदेशी बनावटीचे लढाऊ विमान, तेजस मार्क-१ए ने शुक्रवारी +१७/१०/२५) नाशिक येथील प्लांटमधून आपले पहिले उड्डाण यशस्वीरित्या पूर्ण केले. संरक्षण क्षेत्रात भारताच्या स्वावलंबी होण्याच्या दिशेने हे उड्डाण आणखी एक मोठे पाऊल मानले जाते. बंगरूळ नंतरची ही दुसरी उत्पादन सुविधा असून स्वदेशी संरक्षण क्षमतेच्या दृष्टीने ही एक महत्त्वपूर्ण घडी ठरली आहे पूर्ण भारतीय बनावटीचे तेजस विमान सर्वात हलके लढाऊ विमान आहे ताशी दोन हजार किलोमीटर वेग आणि हवेतच इंधन भरण्याची क्षमता आहे ध्वनीच्या वेगाने १.६ पट म्हणजे सुमारे २०००किमी प्रति तास वेगाने उड्डाण करण्यास हे विमान सक्षम आहे. सर्व दिशांनी लक्ष साधण्याची क्षमता असलेले हे लढाऊ विमान आहे रडार मुळे एकाच वेळी अनेक लक्ष ओळखणे आणि ट्रॅक करणे शक्य होते प्रणालीमुळे मित्र की शत्रू अशी लक्ष ओळख द्वैत शक्य होते रेडिओ मुळे सुरक्षित व सॅटेलाईट द्वारे संवाद साधण्याची सुविधा आहे डिजिटल मॅप जनरेटर मुळे परिसर आणि उंचीची अचूक माहिती मिळते.

तेजस मार्क-१ए हे ४.५ पिढीचे विमान आहे. त्यात अत्याधुनिक रडार, इलेक्ट्रॉनिक युद्ध () संच आणि प्रगत क्षेपणास्त्र प्रणाली आहेत. मिग-२१ त्याच्या काळात अत्यंत सक्षम होते, परंतु तेजस हे आधुनिक काळातील गरजांनुसार तयार केलेले बरेच प्रगत आणि बहुमुखी आहे.

तेजस मार्क-१ए हे स्वदेशी बनावटीचे आणि प्रगत हलके लढाऊ विमान आहे. हे भारताने विकसित केलेल्या एलसीएची प्रगत आवृत्ती आहे आणि चौथ्या पिढीतील बहु-भूमिका लढाऊ विमान मानले जाते. जलद, हाताळता येण्याजोगे आणि अत्यंत अचूक, हे विमान सर्व हवामान परिस्थितीत दिवसा आणि रात्री ऑपरेशन करण्यास सक्षम आहे.ते ५.५ टनांपेक्षा जास्त शस्त्र पेलोड वाहून नेऊ शकते आणि एकाच वेळी अनेक लक्ष्यांवर अचूकतेने हल्ला करू शकते. तेजस मार्क-१ए मध्ये नवीन एईएसए रडार, दृश्यमान श्रेणीच्या पलीकडे (बीव्हीआर) क्षेपणास्त्रे, प्रगत इलेक्ट्रॉनिक युद्ध (ईडब्ल्यू) संच आणि हवेतून हवेत इंधन भरणे यासारख्या अत्याधुनिक क्षमता आहेत. हे स्वदेशी पद्धतीने तयार केले जात आहे, ज्यामुळे देशात आवश्यक बदल करता येतात.

काही वर्षांपूर्वीपर्यंत देशाला संरक्षण उत्पादनाबाबत परकीय देशांवर अवलंबून राहावे लागत असे ६५ ते ७० टक्के साहित्य आयात केले जात असे आता या परिस्थितीत बदल होत आहे आता ६५ टक्के साहित्य देशातच तयार होत आहे लवकरच सर्व साहित्य देशांतर्गत तयार करण्यात येईल. संस्थांच्या सहकार्याने उत्पादित केलेले लढाऊ विमाने ही देशासाठी गौरवाची बाब आहे देशाची हवाई दल नवीन तंत्रज्ञानाच्या विमानांमुळे अधिक मजबूत होईल.

देशांतर्गत संरक्षण उत्पादनांचे मूल्य २०२९ पर्यंत पर्यंत तीन लाख कोटी रुपयांचे उद्दिष्ट ठेवले होते. त्यामुळे देशाचे आयातीवरील अवलंबित्व कमी होईल तसेच संरक्षण उत्पादनांचे निर्यात मूल्य सन २०२९ पर्यंत दुप्पट म्हणजेच ५० हजार कोटी रुपयांपर्यंत करण्याचे ध्येय आहे ते निश्चितपणे साध्य होईल गेल्या दहा वर्षात भारताने गतीने संरक्षण उत्पादन क्षेत्रात प्रगती केली आहे त्यामुळे लढाऊ विमाने क्षेपणास्त्रे यंत्र लढण्यासाठी आवश्यक इलेक्ट्रॉनिक साधनांची निर्मिती भारतातच होत आहे.

विशेष म्हणजे तेजस मार्क-१ए हे पूर्णपणे स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित एक अत्याधुनिक लढाऊ विमान आहे. विमानाच्या तांत्रिक क्षमता आणि कामगिरीमुळे अनेक परदेशी देशांनी ते खरेदी करण्यात उत्सुकता देखील दर्शविली आहे.

गेल्या काही वर्षांत, भारताच्या संरक्षण औद्योगिक पायाचे आधुनिकीकरण आणि विस्तार करण्यासाठी एकत्रित प्रयत्न केले गेले आहेत. भारताच्या स्वावलंबन आणि धोरणात्मक स्वायत्तता वाढविण्यासाठी स्वदेशी संरक्षण उत्पादन आणि तंत्रज्ञान विकासाचे महत्त्व विविध आव्हानांनी अधोरेखित केले आहे. कारगिल युद्धाने भारताच्या संरक्षण औद्योगिक पाया मजबूत करण्यासाठी आणि परदेशी आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी सुधारणा आणि गुंतवणूकीसाठी उत्प्रेरक म्हणून काम केले.

''मेक इन इंडिया'' आणि सार्वजनिक-खाजगी भागीदारीला प्रोत्साहन देण्याचे प्रयत्न यासारख्या त्यानंतरच्या उपक्रमांचा उद्देश स्वदेशी संरक्षण उत्पादन आणि नवोपक्रमाला प्रोत्साहन देणे आहे. गेल्या १० वर्षांत भारताच्या संरक्षण क्षेत्रात लक्षणीय परिवर्तन झाले आहे. गेल्या काही वर्षांपासून, धोरणकर्ते भारतात उत्पादन कसे वाढवायचे आणि भारताला जागतिक उत्पादन केंद्र कसे बनवायचे यावर चर्चा करत आहेत.

तथापि, पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या सरकारने ''मेक इन इंडिया'' आणि ''आत्मनिर्भर भारत'' उपक्रमांतर्गत गुंतवणूक सुलभ करून, नवोपक्रमाला चालना देऊन, कौशल्य विकास वाढवून, बौद्धिक संपत्तीचे संरक्षण करून आणि अत्याधुनिक उत्पादन पायाभूत सुविधा उभारून भारताच्या मरणासन्न संरक्षण उद्योगाला बळकटी देण्यासाठी अनेक सुधारणा सुरू केल्या आहेत.

यामध्ये तंत्रज्ञान हस्तांतरणासाठी परदेशी संरक्षण कंत्राटदारांशी सहकार्य, संयुक्त उपक्रम आणि संरक्षण क्षेत्रात देशांतर्गत उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी ''मेक इन इंडिया'' मोहिमेसारख्या उपक्रमांचा समावेश आहे. शिवाय, संरक्षण खरेदी प्रक्रिया () आणि धोरणात्मक भागीदारी मॉडेलची ओळख यासारख्या भारताच्या संरक्षण खरेदी धोरणांमध्ये बदल खाजगी क्षेत्राच्या सहभागाला प्रोत्साहन देणे आणि स्वदेशी क्षमता वाढवणे हे आहे.

उद्योगांना उत्पादनाची मोठी जबाबदारी घेण्यास सक्षम करण्याव्यतिरिक्त, सरकारने संशोधन आणि विकास करण्यास प्रोत्साहित करण्याचा प्रयत्न केला आहे सरकारने ''मेक इन इंडिया'' मार्गदर्शक तत्त्वांचे सरलीकरण आणि विस्तार केले आहे. आणि दोन नवोपक्रम-केंद्रित योजना सुरू केल्या आहेत –

आज, भारताचा शस्त्रास्त्र उत्पादन लँडस्केप सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, खाजगी संरक्षण कंपन्या आणि परदेशी कंपन्यांशी सहकार्य यांचे मिश्रण आहे. देशाने क्षेपणास्त्र तंत्रज्ञान, नौदल जहाजबांधणी आणि विमान निर्मिती यासारख्या क्षेत्रात लक्षणीय प्रगती केली आहे. याव्यतिरिक्त, संशोधन आणि विकासावर वाढता भर दिला जात आहे, संरक्षण संशोधन आणि विकास संघटना () सारख्या संस्था नवोपक्रम आणि स्वदेशी तंत्रज्ञान विकासात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

# ९९ वे साहित्य संमेलन हे ऐतिहासिक होणार – डॉ. आशुतोष जावडेकर

## अनेक दिग्गज्यांच्या उपस्थितीत साहित्य संमेलनाच्या कार्यालयाचे उद्घाटन

ज्योतिर्मय साहित्य

**सातारा** – साहित्य संमेलन ही कधीकाळी काही मोजक्या साहित्यिकांसाठीची परंपरा होती. तिचा प्रसार सुरू असून जनसामान्यांशी याचे नाते जोडले गेले आहे. साताऱ्याचे ९९ वे साहित्य संमेलन हे हा परीघ वाढवणारे संमेलन ठरेल. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने निश्चितच त्याचा फायदा आपण सर्वांनी घ्यायचा आहे. मराठी मातृभाषा म्हणून आवश्यक आहे. परंतु, जगामध्ये संपर्क वाढवायचा असेल तर इंग्रजी आवश्यक आहे, त्यामुळे इंग्रजी भाषेला आपण मावशी करुया. तिच्या मदतीने अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन जगभरात पोहोचवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करुया, असे आवाहन लेखक डॉ. आशुतोष जावडेकर यांनी केले.

सातारा येथील ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी संमेलनाचे स्वागताध्यक्ष सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, विशेष उपस्थिती खा. उदयनराजे भोसले तर प्रमुख पाहुणे म्हणून रोजगार हमी, फलोत्पादन आणि खार जमीन विकासमंत्री भरतशेठ गोगावले यांची उपस्थिती होती. यावेळी संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी, कोषाध्यक्ष नंदकुमार सावंत, जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष अमोल मोहिते, उपाध्यक्ष विजय बडेकर आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.



जावडेकर म्हणाले, की साहित्य संमेलन म्हटले की, कुठल्याही समस्यांवेळी साहित्य धीर देण्याचे काम करते. सामान्य वाचकाचा साहित्याशी यातूनच आपुलकीचा धागा तयार होतो. हे सामान्य वाचक प्रत्यक्ष साहित्य निर्माण करत नसले तरी वाचन प्रक्रियेतून त्यांचा संबंध येतो. या अर्थाने संमेलने ही सर्वांना सोबत घेणारी व्हावीत, ही अपेक्षा आगामी साताऱ्यातील संमेलन पूर्ण करेल.

जावडेकर पुढे म्हणाले, साहित्य संमेलन म्हटले की, ते होण्यापूर्वी साहित्य वर्तुळात फटाके फुटण्यास सुरुवात होते. संमेलन पुढे न्यायचे असेल तर तरुण पिढी त्यात येणे आवश्यक आहे आणि त्यासाठी अगोदर तरुण लेखक यायला पाहिजेत. ९९ व्या संमेलन हे ऐतिहासिक होणार असून यानिमित्ताने सातारा-पुणे ऐतिहासिक संबंधांची पुनरावृत्ती होईल. यावेळी खा. उदयनराजे भोसले, मंत्री भरतशेठ गोगावले, संमेलनाचे स्वागताध्यक्ष मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले आदींची भाषणे झाली.

# ५० वे राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धा-प्रदर्शन आणि परीक्षण

## दिवाळी अंक संपादक-प्रकाशकांना आवाहन

ज्योतिर्मय साहित्य

**मुंबई** – १९४९ पासून अनेक उपक्रम आणि कार्यक्रमांच्या माध्यमातून सातत्याने कार्यरत असलेल्या आणि वृत्तपत्र लेखन चळवळ यंदा ७६ वर्ष साजरे करीत आहे. मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही ५० वी राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. संस्थेच्या वतीने १९७६ पासून मराठी भाषेची वैभवशाली दिवाळी अंक प्रदर्शन परंपरा जपली जाते आहे. या उपक्रमात गोरेगाव येथील मराठी विचारधारा प्रतिष्ठान ही संस्था दरवर्षी प्रमाणे सहभागी होत आहे. या मान्यताप्राप्त आणि लोकप्रिय स्पर्धेसाठी महाराष्ट्रासह इतर राज्यातूनही अंक येत असतात. सर्वोत्कृष्ट अंकासाठी मनोरंजनकार का र मित्र स्मृती पुरस्कार तर आवाजकार मधुकर पाटकर पुरस्कृत सर्वोत्कृष्ट विनोदी अंक, साने गुरुजी स्मृती सर्वोत्कृष्ट मुलांचा अंक, सर्वोत्कृष्ट धार्मिक अंक, मराठी विचारधारा प्रतिष्ठान पुरस्कृत वसंतराव होशिंग स्मृती महिला संपादित सर्वोत्कृष्ट अंक, कृष्णराव भानुसे स्मृती उत्कृष्ट दिवाळी अंक, पास्कोल लोबो पुरस्कृत गणेश केळकर स्मृती उत्कृष्ट अंक, मनोहरपंत चिवटे स्मृती सर्वोत्कृष्ट आरोग्य विषयक अंक यासह स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या अंकांचा उत्कृष्ट आणि उल्लेखनीय अंक म्हणून पारितोषिक देऊन मराठी भाषा दिन २७ फेब्रुवारी रोजी मान्यवर पाहुण्यांच्या उपस्थितीत गौरव करण्यात येतो. स्पर्धा व प्रदर्शनासाठी आलेले हे अंक मुंबई-ठाणे शहरात प्रदर्शन आयोजित करून मांडले जातात.

*सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त यावर्षी ''जागल्यांचा लोकजागर'' या ब्लॉगवरून दिवाळी अंकांचे परीक्षण प्रसिद्ध करण्यात येणार आहे तसेच गेल्या ५० वर्षातील यावर्षापर्यंत प्रकाशित झालेल्या दिवाळी अंकांची संपर्क सूची मराठी भाषा दिवस साजरा करताना प्रकाशित करण्यात येणार आहे, हे अंक ग्रामीण भागातील शाळा-वाचनालयांना मोफत दिले जातात. दिवाळी अंकांच्या संपादक-प्रकाशकांनी २ प्रती – रवींद्र मालुसरे, अध्यक्ष-मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई, घरकुल सोसायटी, रूम न. ६१२, ६ वा मजला, सेंच्युरी बाजार लेन, भुस्सा इंड. समोर, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५ येथे पाठवाव्यात. असे आवाहन प्रमुख कार्यवाह प्रशांत घाडीगावकर यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी रवींद्र मालुसरे ९३२३११७७०४ आणि सुनील कुवरे ९१६७३६४८७० यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे.


दिपावली निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा








## वास्तुशास्त्र पेंटिंग



लघुलेख-७४

'वास्तुशास्त्र पेंटींग' या विषयावर आपण जवळपास अडीच महिन्यांहून अधिक काळ माहिती घेत आहोत. ह्या स्तंभाचे वाचन करणाऱ्या जिज्ञासु वाचकांना या निमित्त अनेक प्रश्न पडलेले आहेत, हे जाणवले. अनेक जणांनी संपर्क साधून अथवा मेसेज करून प्रश्न व शंका विचारल्या. अनेकांनी तर 'खरंच 'सकारात्मक परिणाम मिळतो का?' असा थेट प्रश्नही विचारला.

आपणांस या निमित्ताने कळवावेसे वाटते की, रंग-चित्राकार, मंत्र-जप यांची निर्मिती जाणकारांनी खूप पूर्वी लेलेली आहे. या साऱ्यांमध्ये सकारात्मकता किंवा नकारात्मकत असतातच पैकी आपल्याला सकारात्मकच घटक शोधून शोधून पेंटिंगसाठी उपयोगात आणता येतात, हे दीर्घ संशोधनानंतर म्हणण्याची, सांगण्याची अधिकारवाणी आहे असं म्हणायला वाव आहे. कारण "वास्तुशास्त्र पेंट्रींग" मध्ये आपण जो दीर्घ संशोधनानंतर सकारात्मक घटकांचाच अंतर्भाव करतो, त्यामुळे, ते पेंटींग वास्तुच्या ठिकाणी लावले जाते. तेथील वातावरणही सकारात्मकच बनते असे निरिक्षण आहे.

इतर शास्त्र जसे की, कुंडली शास्त्र, अंकशास्त्र, ज्योतिषशास्त्र, होरा शास्त्र या व अशा शास्त्रांवर अनेक ग्रंथसंपदा उपलब्ध असल्याने, कुंडलीतील ग्रह ताऱ्यांच्या स्थितीवर, अंशांवर... वगैरे भाकिते केली जातात. "ठोकताळा" नावाचा शब्द खूपदा बऱ्याच ठिकाणी लागू होतोय असे आपल्या ध्यानात यायला लागते. पत्रिके नुसार 'मंगळ, 'वैधव्य-विदुर योग, वगैरे सांगितले जाते, मग चिंता-काळजी सुरु होते. "आत्महत्या, "जाळून घेणे', 'घराला आग लागणे, अपघाती मृत्यु येणे, घटनांच्या वेळी जातकाला त्याच्या/त्याच्या घरातील कर्त्या व्यक्तीचा संदर्भ देऊन कुंडलीतील अमुक-तमूक योग होते/आहेत म्हणून असे घडले....। असेही सांगितले जाते. पाण्यात बुडून मृत्यु,आता नव्याने 'विमान दुर्घटना' पण आलीय आता... !! ज्योतिष सांगतात असे...!! घरात विष पिऊन गेलेला मारामारीत खून, दीर्घ आजारानेही कुणी तरी दगावतो किंवा अनेक प्रकारचे उपचार करुनही ठोस उपाय आढळत नाही, सापडत नाही. खर्चही खूप होतो. प्रसंगी... या व अशा प्रकारच्या प्रसंगांना अनेकांना तोंड द्यावे लागते.

"वास्तुशास्त्र पेंटींग" द्वारे गेल्या १९-२० वर्षात वरील प्रकारचा कुठलाही दावा केलेला नाही. वास्तुशास्त्र पेंटींग" सुमारे १००० हून अधिक जणांनी "आपल्या घरात लावल्यानंतर त्यांच्या कौटुंबिक, वैवाहिक आणि आर्थिक बाबतीत त्यांना अडचणी तर दूरच परंतु अडथळ्यांना, आजारांना शह देण्यासाठी परस्पर मार्ग मिळत गेले.

क्रमशः.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238




## जात्यावरच्या ओव्या......

सासू आत्याबाई
मुगाच्या तोडा शेंगा
देवाधरमाच्या
तुम्ही गोष्टी मला सांगा ||३१२||

सासुआत्या बाई
केली भाकर कळण्याची
ठेच्यावर वतली
धार करडीच्या तेलाची ||३१३||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## वाचन : समृद्धीचे प्रकाशपर्व




ज्योतिर्मय साहित्य

शांता शेळके यांचा सहावे सुख या नावाचा एक लघुनिबंध आहे. त्यात चिनी माणसांचा एक दाखला त्या देतात. दोन चिनी माणसे एकमेकांना भेटली म्हणजे, तुम्हाला सर्व सहाही सुखे प्राप्त होवोत अशा शुभेच्छा ते एकमेकांना देतात. सहापैकी पाच सुखे आपल्या नित्याच्या परिचयाची आहेत.

ती म्हणजे संपत्ती, संतती, प्रसिद्धी, मनासारखा जोडीदार आणि उत्तम आरोग्य. मग सहावे सुख कोणते ? तर अर्थातच ते ज्याचे त्याने शोधायचे असते. सहावे सुख प्रत्येकाचे वेगवेगळे असू शकेल. कोणी ते पुस्तकात शोधेल, कोणी आपल्या आवडत्या छंदात, कोणी परमेश्वराच्या नामस्मरणात. पण आपल्यासारखी सामान्य माणसे नेहमी पहिल्या पाच प्रकारच्या सुखातच आयुष्याची इतिकर्तव्यता मानतात. सुखाच्या मागे आपण आयुष्यभर धावत राहतो. पण मनात आतून कुठे तरी बोच असते, की सगळे मिळूनही काहीतरी अपूर्ण आहे. तुमचे सहावे सुख जेव्हा तुम्हाला सापडेल, तेव्हाच तुम्हाला खरे समाधान लाभेल. मला वाटतं हे सहावं सुख आपण वाचनात शोधायला हरकत नाही. एकदा का आपण पुस्तकांच्या संगतीत राहायला सुरुवात केली ती आपलं बोट धरून आपली वाटचाल आनंदाच्या, सुखाच्या मार्गावर करण्यासाठी मदत करतील.




वाचन प्रेरणा दिन साजरा करताना हे लक्षात ठेवायला हवे की वाचनाची प्रेरणा आजच्या दिवशी जशी आपण घ्यायचा प्रयत्न करतो आहोत तशीच ती आयुष्यभरासाठी कायम राहायला हवी. वाचन किंवा ग्रंथ हे आपल्या जीवनाचा एक भाग व्हायला हवेत. कवी सौमित्र उर्फ किशोर कदम यांची एक छान कविता आहे. या कवितेतील काही ओळींनी आपण आजच्या या लेखाचा समारोप करू या. ते आपल्या मुलांना म्हणतात मी तुमच्यासाठी घर, गाडी, बंगला, पैसा यासारखी भौतिक संपत्ती मागे ठेवली नाही. माझ्या वाडवडिलांनीही तशी ती माझ्यासाठी ठेवली नव्हती. पण मी तुमच्यासाठी पुस्तकरूपाने एक अमूल्य अशी संपत्ती मागे ठेवली आहे. तिचा तुम्ही उपभोग घ्या. ते आपल्या कवितेत म्हणतात

मी नसेन तेव्हा ही पुस्तके असतील
जी नेतील तुला जायचं आहे तिथे.
फक्त मी असेन तिथे मात्र
तुला पोहोचता येणार नाही कारण
मी आधीच होऊन गेलेलो असेन
एखादी कथा, एखादी कादंबरी,
एखादी कविता
एखाद्या पुस्तकातली माझी अनावर
आठवण आली
की या प्रचंड ढिगाऱ्यातलं
ते एखादं पुस्तक शोध
तुझा प्रवास बघ कसा
सोपा होऊन जाईल !






उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## सिद्धलक्षण निरूपण

ज्योतिर्मय साहित्य

मी बांधलेला आहे हा विकल्प सोडून द्यावा मी मुक्त आहे. मी मोकळा श्वास घेत आहे . मला कशाचेही बंधन नाही। पण समाजरचनेसाठी जे जे सद्गुण आवश्यक असायला हवेत ते ते माझ्याकडे आहेत. मी स्वयंसिद्ध आहे. असा निश्चय करून पंचमहाभूतांचा अन्वय करून स्वस्वरूप पहावे.

अन्वय-- अन्वय म्हणजे आहेपणाने आत्मस्वरूपापर्यन्त पोहचणे. जे जे आपल्याला अनुभवायला मिळते ते सर्व काही स्वानंद सागरातील तरंग आहेत. अशा आत्मिय भावनेने पहाणें यालाच अन्वय असे म्हणतात.

व्यतिरेक-जे जे अनुभवायला मिळते, किंवा अनुभवत असताना जास्त विचार न करता कोणत्याही गोष्टीचा फार विचार न करता ते या स्वानंदसागरातील बुडबुडे आहेत अशा मिथ्या पणाच्या भावनेने हा सर्व गोष्टीकडे चराचर म्हणून पहाणे यास व्यतिरेक म्हणतात.

‘‘मी देह आहे‘‘हा झाला पूर्वपक्ष

‘‘मी आत्मा आहे हा सिद्धांत.

मात्र हे लक्षात ठेवावे की आत्मज्ञान झाल्यावर दृष्य प्रकारच्या सर्व प्रकारचे स्वस्वरूप लय पावते. आणि प्रक्रुतीस्वरूपात विलीन होते.

(क्रमशः)

## || निरूपण ||



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री
सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

सुखं त्वं सुखस्यापि मातः प्रदेहि
धनं देहि भक्तिं समाधानमेव।
सदा ते स्वरूपं विलोक्याम्ब मुग्धो
भवामीति भाग्यं महन्मे च मन्ये ।।१२०।।


हे माते, तू सुखाचेही सुख आहेस. मला धन दे. भक्ती दे. समाधान दे. हे अंबे, तुझे स्वरूप पाहून मी सदैव मुग्ध होतो, हे माझे महद् भाग्य मी मानतो.

नेच्छा मम विरामस्य तथापि विरमाम्यहम्।
सलीलपूर्णनेत्राभ्यामम्बे नतोऽस्मि रेणुके।।१२१।।

हे माते, रेणुके, माझी विरामाची इच्छा नाही. तरीही अश्रूपूर्ण नेत्रांनी तुला नमस्कार करून थांबतो.

।। इति श्रीदेवीकृपया चन्द्रहासेन विरचितंश्रीरेणुकाशरणम् ।।

## नामस्मरण, शरणागती आणि भगवत्प्राप्ती



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

भगवत्प्राप्तीला शरणागतीशिवाय मार्ग नाही, आणि शरणागतीला नामस्मरणासारखा उत्तम उपाय नाही. शरणागती म्हणजे, ‘मी कर्ता’ हा अभिमान नाहीसा होऊन, ‘सर्व कर्तृत्व परमेश्वराचे आहे’ ही दृढ भावना होणे. नामाशिवाय इतर साधनांत ‘कृती’ आहे; म्हणजे ‘मी कर्ता’ या अहंकाराला वाव आहे. स्मरण हा मनाचा धर्म असल्याने त्यात कृतीचा प्रश्नच येत नाही, म्हणून त्यात अहंकाराला वाव नाही; शिवाय, स्मरण किंवा विस्मरण या दोन्ही गोष्टी आपल्या हातात नाहीत; म्हणून नामाचे स्मरण झाले तरी त्यात स्वत:चे कर्तृत्व नसते, त्यामुळे ‘मी कर्ता’ ही जाणीव टिकू शकत नाही. ‘मी नामस्मरण करतो’ हा शब्दप्रयोगसुद्धा बरोबर नाही, कारण नामाचे स्मरण ‘होत असते,’ ते ‘करू’ म्हणून जमत नाही. म्हणून शरणागतीला नामस्मरणासारखे दुसरे साधन नाही.

शरणागतीचा दुसरा अर्थ म्हणजे कायिक, वाचिक आणि मानसिक क्रिया थांबविणे. क्रिया न करणे हे कृती करण्यापेक्षा केव्हाही जास्त सोपे आहे; म्हणजेच शरणागती ही सहज-साध्य वाटली पाहिजे. पण अनुभव तसा येत नाही. जी गोष्ट अत्यंत सोपी वाटते ती करायला पुष्कळदा कठीण जाते असा अनुभव येतो. एखाद्याला मोटार वेगात चालव म्हटले तर तो ते सहज करील, पण अती हळू चालव म्हटले तर ते फार कठीण जाते. म्हणून काहीही कृती न करणे हे कृती करण्यापेक्षा फार कठीण असते. गीतेत भगवंतांनी अर्जुनाला ‘तू नुसता मला शरण ये’ असे सांगितले आहे. देहबुद्धी गेल्याशिवाय शरणागती येत नाही. देहबुद्धी, वासना, अहंकार ही सर्व एकच आहेत. जगातल्या वैभवाची आसक्ती आणि परमात्मप्राप्ती या दोन्ही गोष्टी एकत्र असूच शकत नाहीत. म्हणूनच उद्धवाला श्रीकृष्णांनी एकांतात जाऊन हरिचिंतन करायला सांगितले आणि असे केल्यानेच माझी तुला खरी प्राप्ती होईल असे म्हणाले. याचा अर्थ हाच की, जगाकडे पाठ फिरविल्याशिवाय भगवंत मिळत नाही. भगवंताच्या प्राप्तीचे नियम आणि व्यवहारातल्या वस्तू प्राप्त करून घेण्याचे नियम यांमध्ये फरक आहे. मनामध्ये वासना उत्पन्न झाली असता ती तृप्त करून घेण्यासाठी देहाची आणि वस्तूंची हालचाल करणे, हा व्यवहार होय. सूक्ष्म वासना देहाच्या साह्याने जड बनणे हे व्यवहाराचे खरे स्वरूप आहे. परंतु भगवंताचे याच्या उलट आहे. भगवंत हा अत्यंत सूक्ष्म असल्यामुळे, त्याची प्राप्ती करून घेणे म्हणजे जडामधून सूक्ष्माकडे जाणे होय. तेव्हा त्याचे साधन हेही जडामधून सूक्ष्माकडे पोहोचविणारे असले पाहिजे. जड देहाशी संबंधित आणि सूक्ष्माशी निकट चिकटलेले असे साधन असेल तर ते नामच होय.

अनन्यतेशिवाय भगवंताची प्राप्ती नाही; त्यातच भक्ति जन्म पावते.

## शाळेची मज्जा...



अंकुश शिंगाडे,
नागपूर

### भटकंती...

ज्योतिर्मय साहित्य

अलीकडील हाच विषय लक्षात घेऊन सरकारनं २००५ पहिला तासचा पत्ता फेकला. पेन्शन बंद केलं. त्यानंतर हळूहळू लोकांना अंधारात ठेवून कॉन्व्हेंटच्या शाळा आणल्या. या शाळा एवढ्या वाटल्या आणि त्याची जाहीरात केली गेली की अलीकडील काळात मराठीच्या अनुदानीत शाळा मोडकळीस आल्या. कॉन्व्हेंटच्या शाळा आल्या. यातही काही शाळा किस्तवार शुल्क आकारुन शाळा चालवतात. काही शाळा माफक शुल्क घेतात. काही मात्र जास्त. परंतू आज ते शुल्क कमी आहे. त्यातच त्यांची एवढी जाहीरात आहे की सर्व लोकं मग ते कितीही गरीब का असेना, कॉन्व्हेंटलाच टाकतात. त्यातच तो दिवस दूर नाही की सर्व पालक आपल्या पाल्यांना कॉन्व्हेंटला टाकतील व मराठीच्या शाळेत मुलंच मिळणार नाहीत.

महत्वपुर्ण गोष्ट ही लक्षात घेण्यासारखी आहे की आज मराठीच्या अनुदानीत शाळेत कितीही का असेना मुलं आहेत. परंतू ज्यावेळी मराठीच्या अनुदानीत शाळा बंद पडतील, त्यानंतर कॉन्व्हेंटच्या शाळेचं शुल्क एवढं भरमसाट वाढेल की गरीब लोकं आपली मुलं शिकवू शकणार नाहीत. ते आंदोलन करतील. परंतू त्याचा उपयोग होणार नाही. कारण तेव्हा वेळ निघून गेलेली असेल.

आज गरीबीचा आकडा व अनुदानीत शाळेत शिकणा-या विद्यार्थ्यांचा आकडा जास्त आहे. सरकार हा आकडा कमी व्हावा यावर वेळोवेळी प्रयोग करुन प्रयत्न करीत आहे. ती बाब आपल्या लक्षात येत नाही. कारण आपण विचारशील व्यक्तीमत्वाचे असलो तर तेवढ्या चिकीत्सक विचारसरणीचे नाही. सरकारनं याच व्यापारीक विचारानं पेन्शनवर कुऱ्हाड चालवली आणि हळूच शाळेच्या अनुदानावर. ब-याच दिवसापासून नान सॅलरी ग्रँडही बंद आहे. आर टी ई चे पैसे देवू केले. परंतू कोणत्याही शाळेला मिळाले नाही. हा व्यवहारीक बदल काय दर्शवतो? ही विचार करणारी बाब आहे.

विशेष गोष्ट अशी की आज जो पालक साक्षर आहे, त्याला सरकारचं नवीन शैक्षणिक धोरण कळत जरी असलं तरी तो आपल्याला काय करायचंय असा विचार करतो. जो अज्ञानी पालक आहे, त्याला या गोष्टी कळत नाही. जो अल्पशिक्षीत आहे, परंतू त्याचेजवळ भरमसाठ पैसा आहे, तो पालक चिकीत्सक जरी असला तरी तो विचार करतो की आपल्याला काय घेणंदेणं आहे. मरणं मात्र गरीबांचंच आहे.

विशेष गोष्ट ही की वय वर्ष सहा हा शाळा प्रवेशाचा आकृतीबंध पेन्शन बंदसारखाच आकृतीबंध वाटतो. काल पेन्शनधारकांची पेन्शन बंद झाली. उद्या गरीबांच्या शाळा बंद होतील यात शंका नाही. सरकार पुरेपूर स्वरुपात खाजगीकरण करण्यासाठीच लागलं आहे. ही निर्वीवाद सत्य बाब आहे. यामुळं वेळीच सावध व्हावे. नाहीतर तेल गेलं तूप गेलं, हाती धुपाटणं आलं अशी अवस्था देशातील गरीबांची निर्माण होवू शकते. ही शक्यता नाकारता येत नाही. वय वर्ष सहा, ही विद्यार्थ्यांचा विकास करण्यासाठी चांगली बाब आहे. परंतू ती बाब विचारात घेऊन सरकारनं पडद्यामागचं राजकारण करु नये. गरीबांच्या शाळा बंद करु नये म्हणजे झालं.



## आरोग्य संजीवनी

### अभ्यंगस्नानाचे फायदे

ज्योतिर्मय साहित्य

६) हाडं मजबूत होणे - लहान मुलांची नियमित तेलाने मालिश करून अंघोळ घातली जाते. त्यांची हाडं बळकट व्हावी हे त्यामागील कारण होय. पण आपण मोठे झालो कि अपण आपल्या शरीराकडे दुर्लक्ष करतो. पोटातून खाल्लेले कॅल्शियमच आपल्याला पुरेल हा समाज होऊन आपण मालिश करण्याकडे फारसे लक्ष देत नाही. पण ज्यांना हाडं आणि सांधे दुखण्याचा त्रास आहे त्यांनी आपली हाडं मजबूत होण्यासाठी वेग वेगळ्या तेलांनी नियमित मालिश केल्यास त्यांची हाडं मजबूत होतील. नियमित अभ्यंगस्नान केल्याचा हा एक खूप मोठा फायदा आहे. ज्यामुळे मणक्यात गॅप येणे, अवेळी हाडं ठिसूळ होणे, शक्ती जाणे हे त्रास आपल्याला लवकर शिवणार नाहीत.

७) साठी गुणकारी - हि आपल्या शरीरातील सगळ्याच प्रकारची घाण शरीरातुन बाहेर काढण्याची महत्वाची भूमिका बजावत असते. अभ्यंगस्नानावेळी केलेल्या मालिश ने व नंतर अंगावर घेतलेल्या पाण्याने ह्या सिस्टमला भरपूर फायदा होतो. कोणाची शस्त्रक्रिया झाली असेल तर कधी कधी ह्या प्रक्रियेत अडथळा म्हणून पाणी आपल्या शरीरातच साचू लागते. पण डोक्यापासून पायाच्या टाचेपर्यंत केलेल्या मालिशने हे पाणी आणि घाण अंगात साचून राहत नाही ती बाहेर पाडण्यास मदत होते.

८) शरीरासाठी इतर फायदे - याचबरोबर अभ्यंगाचे म्हणजेच मालिशचे भरपूर फायदे आहेत. जसे -

दृष्टी सुधारते.

स्फूर्ती आणि सतर्कता वाढते.

शारीरिक शक्ती आणि बळ वाढते.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

अभ्यंगस्नान करण्याची योग्य पद्धत


तेल कोमट करूनघ्या आणि डोक्यापासून खालच्या अंगापर्यंत क्लॉक वाईज मालिश करत या. प्रत्येका अवयवाला ५ मिनिटे तरी दिल्याचं गेली पाहिजेत. यानंतर अर्धा तास हे तेल अंगात मुरू द्या. आणि मग अंघोळ करा. गाल, मान, पोट, तळपाय कोणताही अवयव अजिबात डावलूनका, सगळ्यांची योग्य मालिश करा. गर्भवती स्त्रियांनी, फ्रॅक्चर झालेल्यांनी आणि कोणती शारीरिक समस्या असलेल्यांनी डॉक्टरच्या सल्ल्याने अभ्यंगस्नान करावे.

अभ्यंगस्नानाचे तेल तयार करताना फायदे दुप्पट होण्याकरता तुम्ही त्यात हळद, कमळाचे मूळ, तुळशीची पानं आणि लवंग यापैकी काहीही घालू शकता. हे औषधी तेल तयार करण्याची कृती खालील प्रमाणे आहे.

थोडे तेल घेऊन ते गरम करायला ठेवा, आणि त्यात वरील सामग्री घाला. आणि २ मिनिटं गरम करून गॅसवरून काढून घ्या आणि २४ तासांसाठी ते बाजूला ठेऊनद्या. याने या सगळ्या समग्रीचे गुण त्या तेलात उतरतील. दुसऱ्यादिवशी हे तेल पातळ कापडाने गाळून घ्या.

या अत्यंत गुणकारी अभ्यंगस्नानाचा फायदा करून घेण्यासाठी आपण रोज हे स्नान करू शकतो.

## संत गाडगेबाबा



- भारत आसाराम बल्हाळ
(एम.ए. मराठी-पीएच.डी. अपीयर)
रिसर्च सेंटर- बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बीड
मो.नं. 7588819471

ज्योतिर्मय साहित्य

‘‘संत गाडगेबाबांचा दशसूत्री संदेश ‘‘गाडगेबाबा प्रबोधन काव्यभुकेलेल्यांना = अन्नतहानलेल्यांना = पाणीउघड्यानागड्यांना = वस्त्रगरीब मुलामुलींना = शिक्षणासाठी मदतबेघरांना = आसराअंध, पंगू रोगी यांना = औषधोपचारबेकारांना = रोजगारपशु-पक्षी, मुक्या प्राण्यांना = अभयगरीब तरुण-तरुणींचे = लग्नदुःखी व निराशांना = हिंमतगोरगरिबांना = शिक्षणहाच आजचा रोकडा धर्म आहे ! हीच खरी भक्ती व देवपूजा आहे !! . संक्षिप्त चरित्र :-

गाडगे महाराजांनी कीर्तनाद्वारे आपले लोकशिक्षणाचे कार्य ऋणमोचन (विदर्भ) या गावापासून सुरू केले.

ऋणमोचन येथे त्यांनी लक्ष्मीनारायणाचे मंदिर बांधले.

१९०८ मध्ये पूर्णा नदीवर घाट बांधून घेतला.

१९२५- मूर्तिजापूर येथे गोरक्षणाचे काम केले आणि एक धर्मशाळा व एक विद्यालय बांधले.

१९१७- पंढरपूर येथे चोखामेळा धर्मशाला बांधली.

‘‘मी कुणाचा गुरू नाही व माझा कुणी शिष्य नाही‘‘ असे म्हणून त्यांनी कुठल्याही संप्रदायाला समर्थन देण्याचे नाकारले.फेब्रुवारी ८, इ.स. १९५२ रोजी श्री गाडगेबाबा मिशन स्थापन करून महाराष्ट्रभर शिक्षणसंथा व धर्मशाळा स्थापन केल्या.गाडगे महाराज गोधडे महाराज म्हणूनही ओळखले जात होते.१९३२ - ऋणमोचन येथील सदावर्त संत गाडगेबाबांनी सुरू केले.. . गाडगे महाराजांनी कीर्तनांद्वारे लोकजागृतीचा मार्ग अवलंबला.

‘‘गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला‘‘ हे गाडगे महाराजांचे आवडते भजन होते.त्यांचे जीवनावर देवकीनंदन गोपाला हा चित्रपटही निघाला आहे. यातील ‘‘गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला‘‘ हे गीत मन्ना डे यांनी गायले. आचार्य अत्रे गाडगेबाबांबद्दल म्हणतात सिंहाला पाहावे वनात, हत्तीला पाहावे रानात, तर गाडगेबाबांना पाहावे कीर्तनात १९३१ वरवंडे येथे गाडगेबाबांच्या प्रबोधनातून पशुहत्या बंद झाली.

(क्रमशः)

# जिंदादिल एसबीएच परिवार-स्नेह मेळावा-२०२५

**ज्योतिर्मय साहित्य**

मित्र हो नमस्कार-

गुरुवार-दि.१६ ऑक्टोबर-२०२५ हा दिवस आम्हा सगळ्यांसाठी - भारावून टाकणारा दिवस ठरला. निमित्त होते एसबीएच रिटायर्ड एम्प्लॉईज वेलफेअर असोसिएशन- पुणे - युनिटच्या त्रै-मासिक मिटिंगचे. अशा स्वरूपाच्या मिटिंगचे विषय पेन्शनर संबंधित अनेक समस्यांचे शंका - समाधान करणे, एकेकाळच्या सहकारी-मित्रांच्या होणाऱ्या भेटी. हे सर्व या मीटिंगमध्ये झाले. ही मीटिंग दीर्घकाळ लक्षात रहाणारी ठरण्याचे कारण वेगळेच आणि मोठे भावनिक आहे. परस्पर आपलेपणा, दीर्घकाळ जपलेले स्नेह संबध ''एसबीएच म्हणजे एक फॅमिली'' हे पुन्हा नव्याने अनुभवतांना उपस्थितांची मने भारावून गेली. मिटिंगचे व्यासपीठ आणि त्यावरील मान्यवर हा यांत्रिक सोपस्कार नसतो, तर त्याला जिव्हाळा-स्पर्श असतो'' याचे श्रेय - सर्वश्री गोविंदराव कोटगीरे, विजयजी राके, बी.एम.कुलकर्णी, आणि मीटिंग आयोजक प्रभाकर निलेगावकर'' या सर्वांचे आहे. या सर्वांनी अशी भावुक, हळवी पारिवारिक वातावरण निर्मिती केली की, सर्वांना एसबीएचचे सोनेरी दिवस आठवले. वयाची पंचाहत्तर वर्षे पूर्ण केलेल्या सहकाऱ्यांचा -सपत्नीक- असा गौरव'' शाल-श्रीफळ, सन्मान-चिन्ह देऊन करण्यात आला. या सत्कारमूर्ती-जोड्या - श्री व सौ- कमलकिशोर लोया, श्री व सौ- एम.एन. अंतवाल, श्री व सौ. मार्तंड पाटील, श्री व सौ.निलेगावकर या होत्या. आपल्या घरच्या माणसांनी केलेला हा सत्कार स्वीकारताना वरील जोड्यांना ''सार्थ समाधान ''लाभल्याचे स्मित त्यांच्या चेहेऱ्यावर झळकत असल्याचे पाहून उपस्थित सर्वांना ''मित्र-ऋण'' फेडत असल्याचा आनंद मिळाला हे नक्की.

मित्र हो- पुण्यासारख्या मोठ्या शहरात निवृत्त -एसबीएच सहकार्याची आणि परिवाराची संख्या लक्षणीय आहे. पण शहराचा विस्तार, व्याप लक्षात घेता, आणि रिटायर्ड माणसांचे नवे रुटीन, फॅमिली-जबाबदारी, हे सगळं लक्षात घेता अनेक मित्रांना इच्छा असून ही मिटींगला येणे जमत नाही ''हे कारण, ही सबब'' दोन्ही सर्वमान्य आहे. आजच्या मिटींगमध्ये पारिवारिक सत्कार-कार्यक्रमाचा समावेश झाल्यामुळे ''मीटिंग'' हे लेबल अलगद गळून पडले, आणि अनुभवला तो एक निर्मळ-आनंदाने भरलेला स्नेह मेळावा. उपस्थित पन्नास-पंचावन्न मेम्बर्सपैकी नव्वद टक्के असे होते की, मी ज्यांच्या सोबत काम केले. काही उल्लेख अगत्याने करतो- माझे बॅचमेट- प्रभाकर पाठक, के. जी.लोया, प्रभाकर निलेगावकर,सुभाष काळे, जेष्ठ सहकारी- एम.व्ही. कुलकर्णी, भास्कर मोटेगावकर, व्ही.बी.जुगुळकर, एस.आर. कुलकर्णी,अशोकराव मान्नीकर, तसेच मित्र-गण- एम.एन.अंतवाल, रघुनाथ लातूरकर, भालचंद्र कडेकर, भजन-गायक औसेकरजी , दिलीप वैद्य, भावे, एन.बी.जोशी, सुश्री-गौरी भिडे,

अन्य सहकारी मित्र- प्रशांत खोत, सुभाष धाट, प्रशांत धामणगावकर, उत्कृष्ट गजल सादर करणारे मुकुंद पांडे.

हरहुन्नरी व्यक्तिमत्व- प्रमोद कुलकर्णी,

श्री.बी.के.संगारेड्डीकर आणि बी.एम.कुलकर्णी या दोन व्यक्ती म्हणजे तमाम एसबीएच पेन्शनरचे ''पालक-मंत्री''

आहेत. सदैव तत्परता ''हा स्वभाव असलेल्या या दोघांच्या

उपस्थितीने हा मेळावा शोभिवंत झाला.

असा गजब का माहौल '' असल्यावर माझ्यासारख्या कवी साठी ''कविता'' सादरीकरण'' म्हणजे सोनेरी संधी ,




''मला कवीचा चष्मा लागला'' ही कविता मी सादर केली.

या मेळाव्याची ''गोड सांगता '' सुग्रास भोजनाने झाली.

भरल्या पोटाने आणि जड मनाने '' घरी परतणे नकोसे वाटत होते.

काही मित्रांची नावे राहून गेलीत '' या विस्मरण दोषाबद्दल क्षमा असावी.

मित्र हो तुम्हा सर्वांच्या सहभागाने हा यादगार कार्यक्रम झाला, त्याबद्दल पुणे युनिटच्या वतीने आभार.

# कुलस्वामिनी प्रतिष्ठान तर्फे दिवाळी निमित्त दिवाळी लक्ष्मी रथ

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : कुलस्वामिनी प्रतिष्ठान तर्फे गेली १५ वर्षापासून प्रत्येक हिंदू सणास नावीन्यपूर्ण,सामाजिक उपक्रम राबविल्या जातात. दरवर्षी दिवाळी सणास मनपा सफाई कामगार, गरीब शेतकरी या सर्वांना दिवाळी मिठाई वाटप केल्या जाते. या पुर्वी महालक्ष्मीची प्रतिमा १५ फुटी, २५ किलो तांदूळ-गहू वापरून, ५००० नाणी वापरून तयार करण्यात आली होती.


या वर्षी दिवाळी निमित्त ''दिवाळी महालक्ष्मी रथ '' तयार करून दिवाळी शुभेच्छासाठी हा रथ सिडको परिसरात सुगम दिवाळी पहाट भजन गाणी लावत फिरवला जात आहे.आठ फुटी दोन लक्ष्मी कटआउट गाडीच्या दोन्ही बाजुस तसेच ५ फुटी गणपती, लक्ष्मी,सरस्वती यांची प्रतिमा समोर भागात सुंदर लावण्यात आली आहे. सर्व गाडीस सुंदर फुल, हार यांनी सजावट करण्यात येऊन ''झाडी लावा झाडी जगवा'' ''उत्तम आहार शाकाहार '' असे संदेश पण लावण्यात आली आहे. सर्व भाविक, नागरिक दर्शन घेत, पुजा करत या उपक्रमाचे कौतुक करत आहेत.हा दिवाळी रथ दोन दिवस शहरामधे फिरणार आहे असे विलास कोरडे व अलका कोरडे यांनी सांगितले. हा रथ सजावटीसाठी अविराज कोरडे, चंद्रमुनी जायभाय प्रल्हाद गायकवाड, ज्ञानेश्वर सागरे, अनिल गावंडे, शुभम सिरसाट, यांनी मेहनत घेतली आहे. कृपया,ही बातमी द्यावी, ही विनंती आपणास दिवाळीच्या गोड शुभेच्छा !



















# दिवाळी अंक मराठी साहित्य, संस्कृतीचा उत्सव- निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला

**ज्योतिर्मय साहित्य**

**नवी दिल्ली –** महाराष्ट्रातील समृद्ध दिवाळी अंक परंपरेने मराठी साहित्य आणि संस्कृतीला वैचारिक उंची प्रदान केली आहे. दिवाळी अंक हे केवळ साहित्य नाही, तर मराठी माणसाच्या सांस्कृतिक आणि बौद्धिक जाणिवांचा उत्सव असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र सदनाच्या निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला यांनी आज येथे व्यक्त केले. दिल्लीतील महाराष्ट्र परिचय केंद्रात आयोजित दिवाळी अंक प्रदर्शन २०२५चे उद्घाटन आयुक्त आर. विमला आणि सकाळ माध्यम समूह संपादक सम्राट फडणीस यांच्या हस्ते झाले. यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी श्रीमती विमला यांनी सांगितले की दिवाळी अंक नवोदित लेखकांपासून ज्येष्ठ साहित्यिकांपर्यंत सर्वांना एक व्यासपीठ देणारे आहेत. दिवाळी अंक हे मराठी वाचकांसाठी 'वाचनाचा महोत्सव' ठरतात. कथा, कविता, निबंध, समीक्षा आणि सांस्कृतिक विषयांवरील लेखांनी समृद्ध



असलेले हे अंक वाचकांची अभिरुची संपन्न करतात. दिल्लीतील मराठी वाचकांसाठी हे प्रदर्शन म्हणजे खऱ्या अर्थाने साहित्यिक पर्वणी आहे. या संधीचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

सकाळ माध्यम समूहाचे संपादक सम्राट फडणवीस यांनी महाराष्ट्र परिचय केंद्राच्या या उपक्रमाचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. परिचय केंद्राची माध्यमांसोबत राहण्याची आणि पाठिंबा देण्याची भूमिका अधोरेखित करून महाराष्ट्र परिचय केंद्राच्या माध्यमातून महाराष्ट्राची सर्वांगीण आणि सविस्तर माहिती उपलब्ध करून देण्यात यावी, अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली. महाराष्ट्र परिचय केंद्राचे हे प्रदर्शन दिल्लीतील मराठी भाषिकांसाठी सांस्कृतिक मेजवानी आहे. वाचकांनी या प्रदर्शनास भेट देवून मराठी साहित्याच्या समृद्ध परंपरेचा आनंद घ्यावा, असे आवाहन प्रभारी उपसंचालक मनीषा पिंगळे यांनी केले.

या कार्यक्रमाला सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे, स्मिता शेलार, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे माजी संचालक गणेश रामदासी, सदनाचे व्यवस्थापक प्रमोद कोलपते, माध्यम प्रतिनिधी, कर्मचारी वर्ग आणि साहित्यप्रेमी उपस्थित होते.

प्रदर्शनात 'गृहलक्ष्मी', 'आवाज', 'मिळून साऱ्याजणी', 'चार चौघी', 'श्री व सौ', 'अंतर्नाद', 'जत्रा', 'किशोर', 'लोकसत्ता', 'महाराष्ट्र टाईम्स', 'लोकमत-दिपोत्सव', 'साप्ताहिक सकाळ', 'झी मराठी', 'धनंजय', 'साधना', 'सामना', 'अक्षरधारा', 'प्रपंच', 'छावा', 'मैत्र', 'निनाद', 'हंस', 'ऋतुरंग', 'स्वरप्रतिभा' यांसारखे १२० हून अधिक विशेषांक उपलब्ध आहेत. याशिवाय हस्तलिखित अंकांचाही समावेश आहे. हे प्रदर्शन २४ ते ३१ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत विनामूल्य खुले राहणार आहे.

# दिवाळी पहाटेच्या सुमधुर गीतांनी श्रोते मंत्रमुग्ध, भारुडाला रसिकांचा प्रतिसाद

**ज्योतिर्मय साहित्य**

**बार्शी–** दीपावली निमित्त येथील श्री स्वामी समर्थ क्लासेसच्या वतीने ग्रामदैवत श्री भगवंत मंदिरामध्ये दिवाळी पहाट हा सुमधुर अभंग आणि भक्तिगीतांचा कार्यक्रम झाला. कार्यक्रमाची सुरुवात तुझ्या कृपेने दिन उगवे हा या गणेश स्तवनाने करण्यात आली.




मागील २५ वर्षांपासून श्री स्वामी समर्थ संगीत क्लासेसच्या माध्यमातून हा दिवाळी पहाट कार्यक्रम भगवंत चरणी प्रस्तुत होत असून यंदाचे हे २६ वे वर्ष होते. यावेळी क्लासचे विद्यार्थी मधुसूदन चांडक, हेमंत साने, अमोल जोशी, अजित काळे, मनस्वी पालके, दुर्वा जाधव, लावण्या पाटील, काव्या पाटील, काव्या मांजरे, गायत्री महाजन, लक्ष्मी भंडारी, उज्वला कानकात्रे, संगीता महिमाने या कलाकारांनी देव माझा विठू सावळा, चिंधी बांधते द्रौपदी, नको देवराया, बोलावा विठ्ठल, कानडा राजा पंढरीचा, जगी जीवनाचे सार, ऊठ पंढरीच्या राजा, संतांचा हा संग, धन्य ती पंढरी, गुरुवीण नाही दुजा आधार, भाग्यदा लक्ष्मी बारम्मा, कृष्ण माझी माता, गंगा मैया, सखा माझा ज्ञानेश्वर, अरे कृष्णा अरे कान्हा, यशोमती मैया से, विठु माऊली तु, वृंदावनी वेणू, पाव ना दत्ता, जय गंगे भागीरथी अशी अवीट आणि सुमधुर गीते सादर करत उपस्थितांची मने जिंकली.

दरम्यान संचालिका दीपाली सहस्रबुद्धे यांनी सादर केलेले 'दाताचं दातवण घ्या गं कुणी' हे सोंगी भारुड तसेच कैवल्य सहस्रबुद्धे आणि सुहास जोशी यांच्या ढोलकी- तबला जुगलबंदीला रसिकांनी उस्फुर्त दाद दिली. या कार्यक्रमाचे संगीत संयोजन प्रसाद सहस्रबुद्धे यांनी केले. तर सूत्रसंचालन माधुरी शिंदे यांनी केले. या कार्यक्रमासाठी तुषार गदगी, प्रतिक शर्मा, सुहास जोशी, कैवल्य सहस्रबुद्धे यांनी तबल्याची तर सरिता कुलकर्णी यांनी संवादिनीची उत्कृष्ट साथ केली. कार्यक्रमासाठी बार्शीकर रसिक उपस्थित होते.

# ज्येष्ठत्व फुलवतांना...

**ज्योतिर्मय साहित्य**



परिपक्व झालेले रसाळ फळ, पूर्ण विकसित झालेले फ ुल म्हणजे ज्येष्ठत्व.. याहीपेक्षा सोनसळी सांध्यपर्व म्हणजे हलकेच फुलविणारे जेष्ठत्व असे मला प्रकर्षाने वाटते.पहाट प्रहरापासून सुरू झालेला हा सूर्यकिरणांचा प्रवास संध्याकाळी अत्यंत सुंदर रंगात उमललेला दिसतो..तसेच आपले वय अनेक अनुभवांची वळणे घेत सांध्य पर्व आल्यावर थोडे स्थिर आणि देखणे होते. खूप जबाबदाऱ्यांमधून मुक्त झाल्यानंतर मिळणारी शांती आणि कदाचित दाह सोसल्यानंतरची सहज येणारी सौम्यता त्यामध्ये असते.केवळ या अपूर्वाईची अनुभूती मात्र आपण मनापासून घ्यायला हवी.

**सौ.माधुरी म.इनामदार**
**मिरज**

पुढे कातर संध्या असते हे जाणीवेतले ज्येष्ठत्वाचे वळण मात्र खूप धोकादायक असते..थोडा जरी तोल गेला तर निराशेच्या दरीत पडण्याची दाट शक्यता असते..म्हणूनच इथे संयत पाऊले टाकत आपले ज्येष्ठत्व जपावे लागते.

आपल्या आणि पुढच्या पिढीत सर्वार्थाने खूप फरक पडलेला आपणास दिसत असतो.अशावेळी जुने सगळे पुसणे शक्य नसले तरी ते जपत आनंदाने नवीन बदलांचाही आपल्याला स्वीकार करता आला पाहिजे..

जगून झालेले क्षण
जुन्या पानात जपावे
डोळ्यातील पाण्यानेच
नवे पान...उलटावे.. इथे

सुधीर मोघे यांच्या या ओळी मला सार्थ वाटतात.

या वयाच्या टप्प्यावर पूर्ण होऊ न शकलेल्या स्वप्नांचा विचार करावा.. शक्य तितकी स्वप्ने आणि राहिलेले छंद जोपासून त्यातील आनंद आपल्याला टिपून घेता यायला हवा. आपल्या अपेक्षा बाजूला सारून अळूच्या पानावरील थेंबासारखे हिरवाईत असूनही सहज विलग होणे जमायला हवे.

ज्येष्ठत्व फुलविण्याची खरी किल्ली म्हणजे उत्कृष्ट आरोग्य आणि आनंदी मन..योग्य व्यायाम आणि विचारात सकारात्मकता असेल तर आपली ओढ सगळ्यांनाच वाटत राहते.

ज्येष्ठ म्हणजे काय तर मोठे..शक्य तेवढी मदत,मैत्रीचा तत्पर हात,आणि आपल्यात आपणच समजूतदारपणा मुरवून घेणे हे मोठेपणाने केले तर आपले ज्येष्ठत्व इतरांनाही हवेहवेसे वाटेल..आपण तसा प्रयत्न नक्कीच केला पाहिजे.. हो ना?

कशास नसत्या चिंता खंती,
वेचू पळती सौम्य उन्हे.
तिमिर दाटता, बनुनी चांदणे
तीच उमलतील संथपणे..
सले कालची विसरून सगळी,
भले जमेचे जीवी स्मरू.
शिशु हृदयाने पुन्हा एकदा,
या जगतावर प्रेम करू..

बा.भ.बोरकरांच्या कवितेतील भाव माझे मात्र ज्येष्ठत्व फुलविण्यास मदत करतात हे मात्र नक्की..

# शुभांगी दामले यांना पहिला पंडिता डॉ. सुजाता नातू स्मृती सन्मान:पुण्यभूषण फौंडेशनच्या दिवाळी पहाट कार्यक्रमात प्रदान

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे–** दिवाळीनिमित्त पुणेकर रसिकांसाठी पुण्यभूषण फाऊंडेशनतर्फे आज बालगंधर्व रंगमंदिरात आयोजित मराठी चित्रपटांच्या सांगीतिक दृकश्राव्य पाऊलखुणा असलेल्या प्रभात ते सैराट या दिवाळी पहाट कार्यक्रमात पहिला दिवंगत ज्येष्ठ कथ्थक नृत्यांगना पंडिता डॉ. सुजाता नातू सन्मान ज्येष्ठ रंगकर्मी शुभांगी दामले यांना कोहिनूर ग्रुपचे चेअरमन आणि कार्यकारी संचालक कृष्णकुमार गोयल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.


यावेळी व्यासपीठावर पुण्यभूषण फौंडेशनचे संस्थापक – अध्यक्ष डॉ. सतीश देसाई, ज्येष्ठ उद्योगपती आणि बांधकाम व्यावसायिक काका धर्मावत आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

ज्येष्ठ कथ्थक नृत्यांगना पंडिता डॉ. सुजाता नातू यांच्या स्मरणार्थ यावर्षीपासून साहित्य, कला आणि नाट्य क्षेत्रात पडद्याआड राहून पायाभूत कार्य करणाऱ्या एका महिलेला एक लाख रुपये देऊन गौरविण्यात येणार आहे. यंदा या पुरस्काराचे पहिले वर्ष आहे. तसेच दरवर्षीप्रमाणे यंदा पुणे सार्वजनिक सभा, सेवा सदन संस्था, प्रार्थना समाज, वेदशास्त्रोक्त सभा, पुणे ग्रंथोत्थेजक सभा आणि गुजरात लॉज (हॉटेल सपना) या संस्था आणि



व्यक्तींना पक्के पुणेकर सन्मान प्रदान करण्यात आला.

प्रभात ते सैराट या दृक्श्राव्य कार्यक्रमात रसिकांनी मराठी चित्रपटसृष्टीच्या विविध टप्प्यांचा आनंद घेतला. प्रभात ते सैराट या दृक्श्राव्य कार्यक्रमाची निर्मीती निश एन्टर्टेन्मेन्टची असून संकल्पना आणि दिग्दर्शन मिलिंद ओक यांचे आहे. या कार्यक्रमात जितेंद्र अभ्यंकर, चैतन्य कुलकर्णी, देविका दामले, मोहिका दामले आणि मालविका दीक्षित यांचा गायनाविष्कार आणि ऋतुजा इंगळे, रिया देसाई, अजय कणसे आणि अभिषेक हावरगी यांचा नृत्याविष्कार रसिकांनी अनुभवला.










हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559